दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.३० जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १५५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 30 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 155 | Pages 4 | Rate 4 Rs


दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
RNI/MAHMAR/2023/87555
॥ महाराष्ट्रभर प्रतिनिधी नेमणूक ॥
https://epaper.vadalvarta.com
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके, सर्कल व गावे येथे उत्साही, निर्भीड व समाजभान असलेले प्रतिनिधी नेमायचे आहेत.
पदे
◆ जिल्हा प्रतिनिधी ◆ तालुका प्रतिनिधी
◆ सर्कल प्रतिनिधी ◆ गाव प्रतिनिधी
पात्रता
✔ पत्रकारितेची आवड व सामाजिक भान
✔ स्थानिक प्रश्न मांडण्याची क्षमता
✔ मोबाईल / डिजिटल माध्यमांचे ज्ञान
✔ बातमी लेखन व फोटो / व्हिडिओ पाठवण्याची तयारी
✔ अनुभव नसला तरी चालेल (नवीन उमेदवारांना संधी)
प्रतिनिधींना मिळणाऱ्या सुविधा
★ दैनिक वादळ वार्ता ओळखपत्र ★ सामाजिक प्रश्नांना व्यासपीठ
★ बातम्या प्रसिद्ध करण्याची संधी ★ पत्रकारितेत नाव व ओळख
★ पुढील काळात विशेष संधी व जबाबदाऱ्या
विशेष सूचना
निर्भीड, अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्यांना प्राधान्य
ग्रामीण व शहरी भागातील उमेदवारांचे स्वागत
मुख्य संपादक : अजय भांगे संपर्क मो.न.9422660077

# शासकीय इतमामात अजित दादा अनंतात विलीन

## बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार; दोन्ही मुलांनी दिला मुखाग्नी

बारामती (वृत्तसंस्था)–महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गुरुवारी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान मैदानावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पार्थ आणि जय पवार यांनी चितेला मुखाग्नी दिला. तेव्हा उपस्थित असलेल्या हजारो समर्थकांचे आणि कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते.

पत्नी सुनेत्रा पवार यांनी पतीच्या पार्थिवावर गंगाजल अर्पण करून अंतिम निरोप दिला. यावेळी शरद पवार, सुप्रिया सुळे, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह देशभरातील विविध पक्षांचे नेते उपस्थित होते.महाराष्ट्रासह इतर राज्यांतील लोकही अजित पवारांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते. काल रात्री उशिरा बारामतीत लोक येऊ लागले. सकाळी अनेक भागात वाहतूक कोंडी झाली. समर्थक दुचाकी, ट्रॅक्टर–ट्रॉली आणि बसेसमधून आले. अंत्ययात्रा एक ते दोन किलोमीटरपर्यंत पसरली.महाराष्ट्र पोलिस दलातर्फे हवेत फैरी झाडून आणि बिगुल वाजवून अजित पवारांना अखेरची मानवंदना देण्यात आली.बारामती येथे बुधवारी सकाळी ८.४६ वाजता झालेल्या भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार (६६ वर्षे ६ महिने ६ दिवस) यांचे निधन झाले. त्यांच्यासोबत वैमानिक सुमीत कपूर, सहवैमानिक शांभवी पाठक, अंगरक्षक विदीप जाधव आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी यादव होते. त्यातील एकही जण वाचू शकला नाही.



















# संपादकीय

## दादा माणूस!

'ते' अजातशत्रू अजिबात नव्हते. तसं होण्यासाठी त्यांनी कधीही प्रयत्न केले नाहीत. कोणीही त्यांचा कधी द्वेष केला नाही. प्रत्येकाच्या मनात ते 'दादा'च होते. ते ना 'साहेब' झाले, ना कुणाचे 'सर'. कुटुंबातल्या कर्त्या मुलासारखं महाराष्ट्राचं 'कर्ते'पण त्यांनी स्वतःच आपल्याकडे घेतलं होतं. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच काळाने महाराष्ट्रावर घाला घातला. संपूर्ण महाराष्ट्राने ज्यांना 'दादा' म्हणून स्वीकारलं होतं, त्यांचा एका विमान अपघातात मृत्यू झाल्याची बातमी काल सकाळी वाऱ्यासारखी पसरली आणि काही काळ कुणालाच काही सुचेनासं झालं. अजितदादा गोड, मधाळ बोलण्यासाठी प्रसिद्ध नव्हते. त्यांनी आलेल्या प्रत्येक माणसाच्या 'हो'ला 'हो' केलं नाही. घरातल्यांपासून ते प्रशासनातील उच्च पदस्थांपर्यंत 'सांभाळून घेण्या'साठी त्यांनी कुणाच्या चुका दृष्टीआड केल्या नाहीत. त्यांचं कुणावरही प्रेम ऊतू गेल्याचं कधी उघड दिसलं नाही. त्यांच्या संपर्कात आलेला कोणीही, कधीही त्यांच्या जिभेच्या फटकाऱ्यापासून वाचला नाही. ते अजातशत्रू अजिबात नव्हते. तसं होण्यासाठी त्यांनी कधीही प्रयत्न केले नाहीत. त्यांच्या नावात 'अजित' असलं, तरी त्यांना घरातल्या घरातच अनेक पराभव पचवावे लागले. काही उघड, काही मनातल्या मनात. अनेकदा त्यांचा स्वतःशीच संघर्ष चालत असे. तेही तो मनमोकळेपणाने बोलून दाखवत असत. गैरवाजवी काम घेऊन आलेल्यावर ते डाफरले नाहीत, असं कधी झालं नाही आणि त्यांना आवर्जून भेटायला गेलेल्याचंही त्यांनी मोठ्या प्रेमभराने स्वागत केलं, असंही झालं नाही. त्यांच्या राजकारणाबद्दल, शरद पवार यांचे पुतणे असल्याबद्दल, त्यांच्यावर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांबद्दल, नंतर वयोवृद्ध काकांचं बोट सोडल्याबद्दल घराघरांत त्यांच्यावर त्या त्या वेळी टीका झाली. पण, कोणीही त्यांचा कधी द्वेष केला नाही. प्रत्येकाच्या मनात ते 'दादा'च होते. ते ना 'साहेब' झाले, ना कुणाचे 'सर'. कुटुंबातल्या कर्त्या मुलासारखं महाराष्ट्राचं 'कर्ते'पण त्यांनी स्वतःच आपल्याकडे घेतलं होतं. त्यामुळे, राज्यातल्या कुठल्याही सभेत कोणीही फाटका तरुण त्यांच्या भाषणात मधेच बोलून अडथळा आणू शकायचा आणि दादाही समयसूचकतेने त्याला प्रतिसाद देऊन आपलं भाषण पुढे नेत असत. हा मनमोकळा आपलेपणा त्यांनी स्वतः कमावला होता. त्यांच्या दुर्दैवी अपघाताने त्यामुळेच महाराष्ट्राचा घात झाल्याची भावना पसरली. त्यांच्या मृत्यूची वार्ता अधिकृतरीत्या आल्यानंतर ज्यांच्या हृदयात कालवाकालव झाली नाही, आपल्या आयुष्यात काही अशुभ घडलं आहे असं ज्यांना वाटलं नाही, अशी माणसं या राज्यातच काय; देशात विरळा असतील. महाराष्ट्राबाहेर संपूर्ण देशातलं राजकीय वर्तुळ, त्या वर्तुळाशी संबंधित प्रत्येक जण हळहळला तो त्यामुळेच. तीस वर्षांपेक्षा अधिक काळ आमदार-मंत्री म्हणून कार्यरत असलेल्या दादांची ख्याती प्रशासन कुशल, महाराष्ट्राची सखोल जाण असलेला, प्रसिद्धीच्या कोणत्याही मोहिमा न राबवता त्यासाठी कोणतीही क्लृप्ती न योजता घराघरांत पोहोचलेला 'दादा' अशी होती. वर्तमानकाळात असे व्यक्तिमत्त्व आणि अशी लोकप्रियता निश्चितच दुर्मीळ आहे.शरद पवार यांचे पुतणे, त्यांचा राजकीय वारस, त्यांनी स्वतःच्या तालमीत तयार केलेला 'घरातला माणूस' म्हणून अजितदादांना खूप फायदा झाला, अनेक संधी त्यांच्या पायाशी चालून आल्या यात शंकाच नाही. त्या अर्थाने त्यांचा राजकीय प्रवास तुलनेने सुखद, विना अडथळा झाला. पण, शरद पवार यांच्यासारख्या प्रभावशाली नेत्याच्या सावलीत वाढूनही त्यांनी त्यांची छाप स्वतःवर पडू दिली नाही. ते आपल्या काकांचे त्या अर्थाने अनुयायी नव्हते. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला स्वतंत्रपणे फुलू दिलं. आपल्या स्वभावाला मुरड घालण्याच्या भानगडीतही ते पडले नाहीत. 'मी जसा आहे, तसा स्वीकारा', असं अव्यक्त आवाहन त्यांनी महाराष्ट्राला केलं आणि ते स्वीकारलंही. महाराष्ट्राचा कानाकोपरा त्यांनी माहीत करून घेतला होता. त्यामुळे, कुठल्याही गावातील मागणी असो, की रेंगाळलेले प्रकल्प असो; त्यातील कृष्णधवल-सारे रंग त्यांना माहीत असत. दीर्घकाळ अर्थमंत्रीपदी राहण्याचा मोह मुख्यतः याच कारणांसाठी त्यांना पडत असावा. शासनकर्ता म्हणून आपल्यावर असलेल्या जबाबदारीची पुरेपूर जाणीव त्यांना असे. अर्थमंत्री पदाच्या माध्यमातून काय रोखायचं आणि कशाला गती द्यायची, यातला समतोल ते नेमका राखत असत. त्यात राजकारण होत नसेल, असं नाही. राजकारण राजकारण्याने नाही करायचं, तर कोणी करायचं? पण, आपल्याकडे जी सत्ता आहे, त्याची मर्यादा कुठपर्यंत आहे, याचीही त्यांना सजग जाणीव असे. ही जाणीव त्यांना कधीही सोडून गेली नाही. त्यामुळे, अनेक मुख्यमंत्र्यांचे उपमुख्यमंत्री म्हणून काम करूनही कोणाही मुख्यमंत्र्यांची त्यांच्याबद्दल कधी तक्रार ऐकू आली नाही. मुख्यमंत्री अन्य पक्षाचा असो, आपल्या काकांचा विरोधक असो, की आपली संधी काढून ज्याला दिली गेली असा असो, मुख्यमंत्र्यांचा मान त्यांनी कधीही खाली पडू दिला नाही. जाहीर तर नाहीच, पण आपल्या विभागाच्या अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अगदी छोट्याशा बैठकीतही नाही. आपल्या विरोधकांबाबतही त्यांनी कधी अपशब्द वापरले नाहीत. ही राजकीय संस्कृती, वैधानिक पदांबाबतचा आदर आणि राजस संयम हाच महाराष्ट्राच्या 'यशवंत परंपरे'चा वारसा आहे. या वारशाचे आपण वारसदार आहोत याची जाणीव आणि अभिमान त्यांना होता. तोंडातून अपशब्द निघून गेला म्हणून ते आत्मक्लेशासाठी कराडच्या प्रीतिसंगमावर जाऊन बसले, ते जबाबदारीच्या त्याच ओझ्याने. राजकारणात तडजोडी कराव्या लागतात. विरोधकांशीच हातमिळवणी करावी लागते. आपल्या प्रकृतीचा विचार करून, जनमानसाचा कौल बाजूला सारून राजकीय निर्णय घ्यावे लागतात. हे सगळं दादांनी केलं. पण, त्याच्या मर्यादाही कसोशीने पाळल्या. त्यामुळे, 'आजकाल सगळेच करतात. कोण करत नाही?' असं त्यांनी कुठे त्याचं जाहीर समर्थन केलं नाही. महायुती सरकारमध्ये सामील असूनही त्यांचं वैशिष्ट्य त्यामुळेच ते अबाधित राखू शकले.

दादांच्या अशा अवचित जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणावर खोल परिणाम अपेक्षितच आहे. गेली अनेक दशकं महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी असलेल्या 'पवार फॅक्टर'चे ते आताचे चलनात असलेले प्रतिनिधी होते. येत्या जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची सरमिसळ अपरिहार्य होती. राज्यात काँग्रेस विकलांग अवस्थेत असताना, भाजपची घोडदौड जोरदार सुरू असताना, हा मधला 'पवार फॅक्टर' राज्यात काम करत होता. आता तो पूर्ण निष्प्रभ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, महाराष्ट्राच्या राजकारणाचा रथ काही काळ असंतुलित होईल. पुन्हा नवं ध्रुवीकरण होईल, नवी समीकरणं जुळतील, राजकारणाचा प्रवाह अखंड प्रवाही राहील. पण, त्या प्रवाहाचं 'अजित दादा' नांवाचं वळण मात्र इतिहासात दीर्घकाळ 'जिवंत' राहील!

# दादा मी तुम्हाला कधीच विसरणार नाही



आज सकाळी ८ वाजता मॉर्निंग वॉकला विक्रोळी कन्नमवार नगरातील धर्मवीर संभाजी महाराज मैदानात गेलो.आणि मोबाईल उघडला तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात.अजित दादा जखमी ही बातमी बघितली.मला वाटल दवाखान्यात असतील.पण घरी गेलो आणि टि.व्ही लावला तर ब्रेकींग न्युज दादा गेले.हे पाहून माझ्या पायाखालची वाळू सरकली.या बातमीवर विश्वास बसत नव्हता.मित्रांचे फोन दणाणले.मी नेहमी प्रमाणे मंत्रालयाची वाट धरली.ट्रेन मध्ये बसलो.आणि दादांच्या आठवणी समोरून दरवळून गेल्या.माझ्या सार्वजनिक जीवनात शरदचंद्र पवार, विलासराव देशमुख,अजितदादा पवार हे नेते माझे आवडते नेते होय.पवार काका पुतणे हे पुणे जिल्ह्याचे असल्यामुळे व मी पुणे जिल्ह्यातील जुन्नरचा रहिवाशी असल्यामुळे या दोघांचा मला नेहमी अभिमान वाटला आहे.पत्रकार क्षेत्रात आल्यानंतर या दोघांचा माझा नेहमीच संबंध आला.दादांचा सडेतोड स्वभाव,स्पष्टवक्तेपणा,एखादाच काम होणार नसेल तर तुझे काम माझ्याकडून होणार नाही.हे सांगण्याची हिम्मत मला नेहमीच आवडत असे.मी लहानपणापासून दादांना पाहत आलो आहे.दादा प्रथम खासदार झाले तेव्हा मी तरुण होतो.पुणे जिल्ह्यातील ऊरळी कांचन येथे माझ्या बहिणीचे शिर्के हॉस्पिटल आहे तेथे मी नेहमी जात असे तेव्हा त्यांची सडेतोड भाषणे मी ऐकली आहेत.त्यानंतर विविध खात्याचे मंत्री,उपमुख्यमंत्री असताना ते नेहमी शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंती उपस्थित असत.त्यानंतर ते जुन्नर शहरात जाहीर मिटींग घ्यायचे तेव्हा भाषणात उभे राहिल्यानंतर ते आजी,माजी,पंचायत, जिल्हापरिषद अध्यक्ष, सभापती यांच्यासह निष्ठावंत कार्यकर्त्यांची नावे वाचून न दाखवता बोलून दाखवायचे.एवढी त्यांची कार्यकर्त्यांची त्यांची नाळ जुळली होती.मला आठवतय २०११ साली माझे सासरे जुन्नरचे आमदार वल्लभशेठ दत्तात्रय बेनके यांच्याकडे मला दलित मित्र पुरस्कार हवा यासाठी गेलो असता ते म्हणाले तू तर मराठा आहेस ना,तुला कश्याला पाहिजे.पण माझ्याकडे पाहून ते म्हणाले,दादांना सांगतो.आणि त्यांनी मला दोन लेटरहेड दिले.आणि त्यावर तूला काय पाहिजे ते लिह असे सांगितले.मी एक पत्र दादांना तर दुसरे तत्कालीन सामाजिक न्याय राज्यमंत्री सचिन अहिर यांना दिले.अहिर यांच्याकडे गेलो असता अरे दोन दिवसानंतर पुरस्कार सोहळा आहे.तू अर्ज केला का असे विचारले.मी नाही म्हणालो.जा बघतो असे ते म्हणाले.त्यानंतर तत्कालीन मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी त्यांच्या एका कार्यकर्त्यांची शिफारस अहिर यांच्याकडे केली.परंतू दादा व अहिर यांनी माझे सासरे आमदार वल्लभशेठ दत्तात्रय बेनके यांचे एकले.माझा अर्ज नसताना देखील मला हा पुरस्कार देण्यात आला.यावर्षीपासून दलित पुरस्काराचे नाव बदलून डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार हे नामकरण झाले.माझे शासन जी आर मध्ये पहिले नाव आले. त्यानंतर मी सामाजिक न्याय खात्याकडे माझा अर्ज दाखल केला.अशी दादांची काम करण्याची पद्धत होती.दादांकडे मला डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण मिळाला.मी त्यांचा वल्लभशेठ दत्तात्रय बेनके यांचा रूणी आहे.दादांचा वाढदिवसानिमित्त मी मासिक जाग मराठा च्या वतीने विशेषांक काढला होता.त्यावेळी त्यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख यांनी मला लेख देऊन सहकार्य केले होते.त्यावेळी दादांना अंक आवडला होता. देशमुख यांचे चार महिन्यापूर्वीच हृदयविकाराने निधन झाले.त्यावेळीची घटना सुध्दा मनाला चटका लावून गेली दरवर्षी नागपूर हिवाळी अधिवेशनात पत्रकारांच्या सुयोग या निवासस्थानी दादा येत असायचे आणि अनौपचारिक गप्पांमधून बातमी द्यायचे.आता या गप्पा होणार नाहीत.दादा तुम्ही दिलेला सहवास नेहमीच लक्षात राहील. तुमच्या जाण्याने आयुष्यातील पोकळी कधी भरुन निघणार नाही.

दादा मी तुम्हांला कधीच विसरणार नाही.

**-नासिकेत कृष्णकांत पानसरे**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन सन्मानित**

# खरी डिजिटल साक्षरता



विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारताने कम्प्युटर युगात पहिले पाऊल टाकले तेव्हा सर्वसामान्यांना कम्प्युटर ही गोष्ट गूढ आणि जणू जादूच वाटायची. 'बटण दाबल्यावर काहीतरी बिघडेल' अशी भीती मनात असायची. परंतु आता कम्प्युटर हे केवळ यंत्र राहिलेले नाही. ते माणसाच्या विचारविश्वात शिरले आहे. अर्थात, ही वाटचाल एक दिवसात घडलेली नाही.

विसाव्या शतकाच्या अखेरीस, कम्प्युटरविषयी जनसामान्यांमध्ये असणारी अनामिक भीती, शंका, आणि संकोच दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एमएस-सीआयटी हा कम्प्युटर साक्षरतेचा मूलभूत अभ्यासक्रम सुरू केला. हा अभ्यासक्रम म्हणजे ग्रामीण ते शहरी, शिक्षक ते नोकरदार, तरुण ते गृहिणी, सर्वांसाठी एक नवा अध्याय होता. कोकणातील एखादा शिक्षक, छत्रपती संभाजीनगरमधील शेतकऱ्याचा मुलगा, नागपूरमधील घरकाम करणारी महिला, पुण्यातील छोटा व्यापारी - सगळ्यांनी कम्प्युटर शिक्षणाच्या या प्रवासात पहिले पाऊल टाकले. कम्प्युटरला बिचकणारा समाज आता आत्मविश्वासाने त्याच्या कळा दाबू लागला. त्या काळात डिजिटल साक्षर ही ओळखच प्रतिष्ठेची बाब होती.परंतु, आता आपण एका नवे वळण घेतले आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केवळ साधन म्हणून नसून, निर्णय घेण्याच्या क्षमतेशी जोडला गेला आहे. कृत्रिम प्रज्ञा (एआय), मोठ्या प्रमाणावर भाषिक विश्लेषण करणारी उपकरणे, चॅटजीपीटी आणि ध्वनिचित्र विश्लेषण, हे सारेच शिक्षणात प्रवेश करत आहेत. पण हे करताना आपण मूलभूत प्रश्न विचारायला हवा - आपली शिक्षणव्यवस्था या बदलांसाठी मानसिक, बौद्धिक आणि व्यावहारिकदृष्ट्या सज्ज आहे का? शाळा-महाविद्यालयांमध्ये कम्प्युटर विषय असतो, पण त्या विषयाचे शिक्षण देणारा शिक्षक नसतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कम्प्युटर लॅब आहे, पण त्याचा स्विच क्वचितच चालू होतो. शहरी कॉलेजांत आधुनिक फळ्यांवर चित्रफिती दाखवल्या जातात, पण त्या मागे संकल्पना स्पष्ट करणारा शिक्षकच अस्पष्ट असतो. म्हणजे आपण साधने घेतली, पण संकल्पनांमध्ये कमकुवत राहिलो. याच काळात विद्यार्थ्यांच्या हातात मोबाइल आला, डेटा आला, आणि इंटरनेटवरची सर्व माहिती सहज उपलब्ध झाली. पण ही माहिती त्यांच्या विचारक्षमतेला पोषक ठरत आहे का? की केवळ 'तयार उत्तर' मिळवून, न विचार करता स्वीकारायची सवय त्यांना लागली आहे?

आज शाळा, कॉलेजांत ऑनलाइन शिक्षण, 'कम्प्युटर शिक्षण' आदी घोषवाक्ये सतत ऐकायला मिळतात. पण प्रत्यक्षात शिक्षकांना शासनाच्या 'दिक्षा', 'स्वयं', 'पीएम ई-विद्या' यांसारख्या व्यासपीठांची माहिती आहे का? ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी, मोबाइल डेटा, स्मार्टफोन, कम्प्युटर अक्षरज्ञान हे अजूनही आव्हान आहे. शहरांमध्येही ही स्थिती फारशी वेगळी नाही. अनेक शिक्षक कम्प्युटर शिक्षणावर विश्वास ठेवतात, पण प्रत्यक्षात त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात मागे पडतात. दुसरीकडे, विद्यार्थी वर्ग अधिक डिजिटल झाला आहे, परंतु अधिक अभ्यसनशील, विचारशील वा सर्जनशील झालेला नाही. माहितीचा स्फोट झाला असला तरी ज्ञाननिर्मितीचे प्रमाण घटले आहे. याला कारण ठरत आहेत चॅटजीपीटीसारखी साधने... जी उत्तरे तयार करून देतात. अशा साधनांचा वापर होणे चुकीचे नाही, पण त्यांच्यावर अवलंबून राहणे चुकीचे आहे. एका नामांकित कॉलेजात असेच घडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभ्यास प्रबंधाची भाषा, संरचना आणि उदाहरणे इतकी उच्च प्रतीची होती, की ती त्या विद्यार्थ्यांच्या पातळीला शोभणारीच नव्हती. चौकशीनंतर समजले की, सर्व प्रबंध एआय साहाय्यकाद्वारे तयार केलेले होते. हे पाहून शिक्षणसंस्थेने विद्यार्थ्यांना दोषी ठरवले, पण खरा दोष कोणाचा? शिक्षणपद्धतीने त्यांना हे साधन कसे वापरायचे हे शिकवले नव्हते. शिक्षकांनाही याची माहिती नव्हती, प्रशिक्षण नव्हते. आज शिक्षण फक्त 'माहिती देणे' इतकेच मर्यादित राहिले आहे का? शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट चिंतन, चर्चा आणि चिरंतन जिज्ञासा नाही का? विद्यार्थ्याला जर कुतूहलच नसेल, तर मग त्याला डिजिटल यंत्रातून आलेली उत्तरे फक्त 'आशय' देतील, अर्थ नाही.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ कम्प्युटर साधन नाही, तर विचारप्रक्रियेवर परिणाम करणारे शक्तिशाली माध्यम आहे. शिक्षण क्षेत्रात या साधनांचा उपयोग करताना नैतिकता, संदर्भाधारित समज, माहिती विश्वसनीयतेचा अभ्यास, आणि सर्जनशीलतेची वृद्धी याचा विचार करणे आवश्यक आहे. या सर्व पैलूंमध्ये ग्रंथपालांची भूमिका केवळ पूरक नव्हे, तर केंद्रीय ठरते. ग्रंथपाल हे केवळ पुस्तकांचे व्यवस्थापक नसतात; ते माहितीचे सूत्रधार, संशोधन मार्गदर्शक, संदर्भ चित्रीकरणाचे तज्ज्ञ, आणि माहिती साक्षरतेचे शिक्षक असतात. आज एआयसारख्या प्रणाली शैक्षणिक जगतात झपाट्याने प्रवेश करत असताना, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना या प्रणालींचा जाणीवपूर्वक, विवेकपूर्ण आणि नैतिक वापर शिकवण्याची जबाबदारी ग्रंथपालांवर येते. विद्यार्थ्यांना चॅटजीपीटीसारख्या प्रणालींपासून आलेली माहिती कोणत्या स्रोतावर आधारित आहे, ती विश्लेषणात्मक आहे की नाही, तिचा बौद्धिक संपदा हक्क (कॉपीराइट) काय आहे, हे समजून घेण्यासाठी ग्रंथपालांचे मार्गदर्शन अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे शिक्षकही शिक्षण साहित्य तयार करताना योग्य संदर्भ शोधणे, विश्वासार्ह माहितीचे मूल्यांकन करणे, वाचनयादी बनवणे आणि आंतरराष्ट्रीय शोधनैतिक नियम पाळणे या सर्व बाबतीत ग्रंथपालांकडून सशक्त मदत घेऊ शकतात.त्यामुळे शैक्षणिक संस्थांनी ग्रंथपालांना पारंपरिक चौकटीत अडकवून न ठेवता, त्यांना डिजिटल व एआय युगाच्या 'माहिती नेत्यां'सारखी भूमिका द्यायला हवी. प्रशिक्षण, धोरणनिर्मितीतील सहभाग आणि निर्णय प्रक्रियेत त्यांना सक्रिय स्थान देणे ही केवळ गरज नसून, शिक्षणाच्या उज्वल भवितव्यासाठीची अपरिहार्यता आहे.

केवळ कम्प्युटर उघडणे, वापरणे किंवा संदेश पाठवणे एवढीच साक्षरता मर्यादित आहे. माहिती कोणती योग्य? तंत्रज्ञानाचा वापर नैतिक आहे का? कम्प्युटर हे साधन आहे, की पर्याय? निर्णय घेताना कृत्रिम बुद्धिमत्तेवर किती विसंबायचं? याबाबत जी विश्वेषण करते ती खरी डिजिटल साक्षरता. उल्लेख केलेल्या या प्रश्नांची उत्तरे आपल्या शिक्षणसंस्थांनी द्यायला हवीत. शिक्षकांना नियमित तांत्रिक प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांना त्याचा सर्जनशील व विवेकाधिष्ठित वापर शिकवला गेला पाहिजे. आणि शासनाने 'डिजिटल साक्षरता' ही केवळ घोषणा म्हणून न मांडता, ती एक सामाजिक गरज म्हणून ओळखून तिची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी करायला हवी.आज आपण कम्प्युटर शिक्षणाच्या दुसऱ्या पर्वात प्रवेश करत आहोत. पहिले पर्व एमएस-सीआयटीचे होते. त्यात कम्प्युटर हाताळण्याचे कौशल्य मिळाले. पण दुसरे पर्व हे कृत्रिम प्रज्ञा, माहिती विश्लेषण आणि नैतिक वापराच्या शाश्वत मूल्यांवर आधारित असायला हवे. शिक्षण हे केवळ माहिती देणारे नसावे. ते विचार देणारे, प्रश्न विचारायला लावणारे आणि समाज घडवणारे असावे. जर आपण शिक्षणाचे हे मूलभूत उद्दिष्ट विसरलो, तर तंत्रज्ञानाच्या भूलथापांमध्ये आपले ज्ञान हरवून बसेल. आपण तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे, पण त्याचा उचित वापर, सतत प्रशिक्षण, शिक्षकांची सजगता आणि विद्यार्थ्यांची जबाबदारी हाच खरा 'डिजिटल भारत' घडवणारा मार्ग आहे.

# शिळे होताच हे ५ पदार्थ होतात रुचकर आणि आरोग्यदायी, आजारांना पळवून लावतात



जेवण नेहमीच तेवढेच बनवावे जेवढ्याची गरज आहे. आयुर्वेद असो की मॉर्डन सायन्स दोन्हींच्या मते जेवण नेहमी ताजे आणि लागलीच बनवून खायला हवे. अन्न फ्रिजमध्ये ठेवल्याने त्याची चव आणि पोषक तत्वे कमी होतात असेही म्हटले जाते. परंतू काही पदार्थ असे असतात जे शिळे झाल्यानंतर अधिक रुचकर होतात आणि त्यातील पोषक गुणही वाढतात. चला तर असे पदार्थ पाहूयात अनेक घरात रात्री उरलेल्या चपात्या सकाळी चहा सोबत खाल्ल्या जातात. जर रात्री चपात्या शिल्लक राहिल्या असतील तर त्यांना गरम करुन खाणे फायद्याचे ठरु शकते. वास्तविक शिळ्या चपात्यात फर्मेंटेशनची प्रक्रिया सुरु झालेली असते. ज्यामुळे गट हेल्थसाठी ती फायदेशीर असते. त्यामुळे एकूणच पचनास फायदा होतो. डायबिटीज मॅनेजमेंटसाठी देखील ही फायद्याची म्हटले जाते.

**पोटासाठी चांगला शिळा भात**

रात्रीचा उरलेला शिळा भात सकाळी आणखी पौष्टीक होतो. भारताच्या अनेक राज्यात शिळा भाताला फोडणी देऊन एक डिश म्हणून खाल्ले जाते. शिजलेल्या भाताला रात्रभर भिजवले जाते. सकाळी यात कांदा, मीठ, मिरची टाकून खाल्ले जाते. यास पन्ता भात आणि शिळा भात म्हणून खाल्ले जाते. हा फर्मेंटेड राईस पोटासाठी चांगला असतो. यात आयर्न, सोडियम, पोटॅशियम आणि कॅल्शियम सारखे पोषक तत्वं देखील भरपूर असतात.

**शिळी खीर टेस्टी आणि हेल्दी**

भारतीय घरात जेवणात काही गोडधोड खाल्ले जाते. गोड खाण्यासाठी अनेकदा तांदळाची खीर बनवली जाते, हीचा स्वाद एकदम भारी असतो. परंतू तुम्ही रात्री उरलेली शिळी खीर खाता का ? ती आणखीनच टेस्टी लागते आणि आरोग्यासाठी देखील फायद्याची असते. रात्री उरलेली खीर फ्रिज थंड करण्यास ठेवावी आणि सकाळी दुसऱ्या दिवशीचा तिचा स्वाद घ्यावा. थंडगार खीर रबडी सारखी स्वादिष्ठ होते. तुमच्या पोटाच्या आरोग्यासाठी देखील चांगली असते.

**शिळे दही देखील फायद्याचे**

एक वा दोन दिवस जमण्यासाठी ठेवलेले दही देखील शिळे झाल्यावर फायदेमंद असते. त्यात फर्मेंटेशनची प्रक्रीया वेगाने होते. आणि गुड बॅक्टेरियाची ग्रोथ वाढू लागते. या प्रकारचे दही पचनासाठी चांगले असते. हे शिळे दही पचन सुधारण्यासोबतच इम्युनिटी पॉवर देखील वाढवते. अशा दह्यातील विटामिन्सचे प्रमाण वाढते. ज्या लोकांना दूध वा दही पचत नाही त्यांच्यासाठी शिळे दही उत्तम असते.केवळ भातच नाही तर राजमा चावल देखील शिळा झाल्यानंतर जास्त चविष्ट आणि आरोग्यदायी असतो. रात्रभर राजमा ठेवला जातो, तेव्हा त्यातील मसाले आणि बिन्स चांगले मिक्स होतात . त्यामुळे चवही चांगली होते. यातील कार्ब्स ब्रेकडाऊन होऊ लागतात. त्यामुळे पचन सहज होते. राजमात प्रोटीन, फायबर, आयर्न आणि पोटॅशियम सारखे अनेक पोषक तत्वं असतात. ज्यांना एब्जॉर्ब करणे आणखीन सोपे होते.

# तुंगी गणातील परमेश्वर लांडगे यांचा प्रचाराचा झंजावात

## मतदारांतून मिळतोय उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

_जिल्हा परिषदेच्या अशिव गटातील भारतीय जनता पक्षाचे तुंगी गणातील पंचायत समितीचे उमेदवार परमेश्वर श्रीमंत लांडगे यांनी प्रचाराचा झंजावात सुरू केला आहे.बुधवार दिनांक २७ जानेवारी रोजी तुंगी,वानवडा,मसलगा माळुब्रा येल्लोरी येथे पदयात्रेच्या माध्यमातून जनतेच्या अडीअडचणी जाणून घेत सर्वसामान्य मतदारांच्या व महिलां मतदारांच्याही गाठीभेटी घेतल्या. अशिव जिल्हा परिषद गटातील नागरिकांच्या अडचणीसोडविण्याचा दृढविश्वास लांडगे यांनी व्यक्त केला. अशिव गटातील तुंगी गणातील जनतेच्या विकासासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजना सह देशांचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस औसा विधानसभा मतदारसंघाचे विकासपुरुष आ.अभिमान्यू पवार व लातूर ग्रामीण चे आ.रमेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली गणांच्या विकासासाठी



भरीव विकास निधी उपलब्ध करून अशिव गटासह गणांतील सर्व गावांचा काय पालट करण्यात येईल असे आश्वासन परमेश्वर श्रीमंत लांडगे यांनी दिले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'सबका साथ सबका विकास' हा नारा घेऊन या मतदार संघात विकासाचे नवे पर्व सुरू करण्याचा निर्धार लांडगे यांनी बोलून दाखविला.भारतीय जनता पक्षाच्या वतीने परिसरातील उच्चशिक्षित,तरुण तडफदार वेळेला धावून येणारा सुख दुखात सोबत असणारा याच परिसरातील चेहरा असणारा शिंदाळा गावचा ग्राम रोजगार सहाय्यक माध्यमातून गावातील अनेक विकासकामे मार्गी लावल्याने, कोणत्याही वेळी जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याने गावच्या जनतेने त्यांच्या पत्नी सौ मायावती परमेश्वर लांडगे यांना गावच्या सरपंच पदावर विराजमान केले.सरपंच पद भेटले म्हणून कधीही दिखाऊ पणा न करता कामातून ओळख निर्माण करत विकासाचा पॅटर्न राबवत गावचा कायापालट केला. एक रोजगार सहाय्यक काय करू शकते हे परमेश्वर लांडगे यांच्या कडे पाहिल्यावर दिसून येते.त्यांच्या कार्यांची गणातील असणारी लोकप्रियता पाहून भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांना पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी मैदानात उतरले.पक्षांने टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी लांडगे यांनी पक्षातील ज्येष्ठ नेत्याचा आशिर्वाद घेत होऊ घातलेल्या पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी करत संपूर्ण गण पिंजून काढत भेटीगाठी जोरदार सुरू केल्या आहेत.पक्षाने दाखवलेल्या विश्वासाला पात्र ठरत प्रामाणिकपणे आणि पक्षनिष्ठा बाळगून काम करणाऱ्या तसेच सर्व जाती धर्माला सोबत घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जाणून घेणारा लोकप्रतिनिधी परमेश्वर लांडगे यांना प्रशासनातील असणारा अनुभव,मतदारांच्या प्रती असणारी असता, उच्चशिक्षित कार्यकुशल तरुण उमेदवार लांडगे यांच्या रूपाने मतदार संघाला मिळाला असून सुजाण मतदारांनी भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत गावभेटीचा सपाटा लावला असून गणामधील गावातील अनेक तरुण कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा देत आहेत.त्यामुळे तुंगी गणातून मोठ्या मताधिक्याने आज रोजी तरी प्रचारात आघाडी घेतली असून यांचा फायदा नक्कीच भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार यांना होणार असल्याचे अशिव गटा व तुंगी गणातील जनता बोलताना दिसत आहे.

# बिलोलीत कै.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली




दैनिक वादळ वार्ता

**बिलोली** । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री लोकनेते अजित दादा पवार यांचे विमानाच्या अपघातात दि २८ जानेवारी रोजी सकाळी ०८ : ४५ वाजता निधन झाले. बुधवारी सकाळी बारामती विमानतळाजवळ त्यांचे विमान ऋत्त कोसळले आणि या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या निधनामुळे महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. बिलोली येथे व्यापार पेठ बंद करण्यात आले होते. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने कै. अजित दादा पवार यांच्या सह सहकार्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आले यावेळी राष्ट्रवादीचे सुनिल एमबडवाड , आनंद बिरादार, भिमराव खांडेकर, शेख वाजिद,मुकुंद गादगे, इंद्रजित तुडमे, अमजत चाऊस ,दिलीप उत्तरवाड,सय्यद रियाज, मिलींद मांजरमकर, शेख पाशा भाई, प्रशांत अंकुशकर, संतोष अंकुशकर,राजकुमार गादगे, फेरोज खान प्रविण सोनकांबळे, संग्राम जेठे, अनिल अंबेराय,इरफान शेख, शिलरत्न जाधव,सुमित देवके, भिम देवकरे, रोशन तुडमे, रिजवान शेख, विजय जोगदंड, विरु देवकरे सह अनेक जन उपस्थित होते.

# एलआयसीत उत्कृष्ट कामगिरी एल आय सी विमा सखी अर्चना हनुमान कोकाट पुरस्काराने सन्मानित




दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । आकाश सोनवणे**

गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील बीड एलआयसी शाखा येथे कार्यरत असलेल्या विमा सखी अर्चना हनुमान कोकाट, ठाकर आडगाव यांना संभाजीनगर विभागातून उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल एलआयसी ऑफिस संभाजीनगर शाखा येथे २६ जानेवारी रोजी संभाजीनगर विभागीय अधिकारी यांच्या हस्ते जेसीबी ने हार घालून व पूर्ण संभाजीनगर विभागीय अधिकारी यांच्या उपस्थीत गणतंत्र प्रतिष्ठा ट्रॉफी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे आणि तसेच एलआयसी बीड शाखेतील शाखा अधिकारी गणेश औटी सर, नितीन मगरे सर, गेवराई शाखेतील अधिकारी हरी पांढरे सर यांच्या उपस्थित कौतुकाचा वर्षाव करण्यात आला व जिल्हाभरातून शुभेच्छाचा वर्षाव झाला आहे.

# नांदेड स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड व स्वराज्य २०२६ सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची निवड

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड। प्रतिनिधी**

स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड व स्वराज्य पक्ष नांदेड यांच्या वतीने शिवजन्म समितीची अध्यक्ष व कार्यकारणी निवड करण्यात आली

अध्यक्ष : सदा पाटील पुयड

कार्याध्यक्ष : शिल्पाताई शेंडगे

कार्यकारी आध्यक्ष : अनिल पाटील तेलंग व भागवत पाटील ढेपे कापसीकर

स्वागताध्यक्ष : माधव पाटील वडवळे व शिवा पाटील शिंदे

उपाध्यक्ष : निरंजन पाटील कदम

सचिव : साईराज पाटील ढगे व राहुल पाटील शिंदे

सहसचिव : संदीप पाटील पुयड

कोषाध्यक्ष : शंकर पाटील पानपटे.यावेळी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड असंख्य पदाधिकारी व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शिवाजी विद्यालय हंडरगुळी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

हंडरगुळी शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हंडरगुळी (ता. उदगीर) २६ जानेवारी रोजी भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ध्वजारोहणाने झाली. पर्यवेक्षक (स्काऊट मास्टर ) बालाजी चंद्रकांत सुगावे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीताने संपूर्ण परिसर भारावून गेला होता .यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य यांच्या माध्यमातून देशप्रेम व्यक्त केले. पर्यवेक्षक बालाजी सुगावे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगत भारतीय संविधान, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचे मूल्य स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. ध्वजारोहणापूर्वी भारताच्या संविधानामधील उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. पर्यवेक्षक (स्काऊट मास्टर ) बालाजी चंद्रकांत सुगावे यांनी महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर




गीतांवर सामूहिक कवायतीचे सादरीकरण केले. या सामूहिक कवायतीसाठी क्रीडा शिक्षक जाधव आर. जी. यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या प्रभात फेरीचे मुख्य आकर्षण हे लेझिम पथक व टिपरे पथक यांनी देशभक्ती गीतावर अतिशय सुंदर प्रात्यक्षिक करून दाखविले. काही विद्यार्थ्यांनी विशेष वेशभूषा केली होती. या सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा. रामचंद्र घटकार यांनी केले. यावेळी विद्यालयातील ए एस मोमीन, मैलारे एम. टी, बगाडे टी.एस, गायकवाड बी.ए, नाटकरे बी. एस, कासले वैभव, गायकवाड एस. बी, पाटील आर. व्ही, सौ. भंडारी एस.जी, सौ. नारागुडे के.पी, सौ. गुडाप्पे आर.एस, सौ. कनकुरे एम. एम, सौ. येलाले के.व्ही, सौ. गायकवाड पी. एन, सौ. कुरुळेकर एस. एन, सौ संगमवार एस.टी, सौ. विशाखा कांबळे, तांबोळी सुमयाँ मॅडम, सौ.कांबळे शकुंतला , मळभागे एस.बी, भोसले ए. डी, अभिजित भोसले व गावातील युवक, युवती व प्रतिष्ठित नागरिक यांची उपस्थिती होती.

शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ध्वजारोहण सर्वसामान्य नागरिकांना मिळतो मान सन्मान

दैनिक वादळ वार्ता

**पाचोड । प्रतिनिधी**

मुरमा येथे गेल्या पाच वर्षापासून ध्वजारोहण करण्याची प्रथा एका महिला सरपंचांनी बदलली आहे स्वतः ध्वजारोह न करता गावातील जेष्ठ नागरिक, स्वतंत्र सैनिक,यांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. हा निर्णय सौ उषा दिनकर मापारी यांनी घेतला आहे या निर्णयामुळे महिला सरपंच सौ उषा दिनकर मापारी यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जाते.

राजकारणात अनेकदा पदाचा मान स्वतःकडे ठेवण्याचा कल असतो परंतु सरपंच सौ उषा दिनकर मापारी यांनी गेल्या पाच वर्षापासून जो पायंडा पाडला आहे तो सामाजिक समरचनेच एक उत्तम उदाहरण आहे. यातून लोकशाहीचा खरा सन्मान दिसून येतो सरपंच असूनही स्वतः ध्वजारोह न करता गावातील कष्टकरी सामान्य नागरिकांना हा मान दिला.जातो



पण हे केवळ अधिकारासाठी नसून ते जनतेच्या सेवेसाठी आहे हेच त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. यावर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त कमलबाई आहेर या सामान्य महिलेच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.एका कष्टकरी महिलेला असा बहुमान मिळणे हे गावातील इतर महिलांसाठी आणि विशेषता तरुण मंडळी साठी मोठे प्रोत्साहन देणारे ठरत आहे. मागील पाच वर्षांची सातत्यपूर्ण परंपरा हे केवळ एकदा घडलेले नसून गेल्या पाच वर्षापासून सौ उषा मापारी यांनी ही प्रथा जपली आहे कधी ज्येष्ठ नागरिक तर कधी सामान्य ग्रामस्थ समाजातील शेवटच्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले आहे. मुरमा पॅटर्न हा इतर गावासाठी आणि लोकप्रतिनिधीसाठी एक मार्गदर्शक ठरू शकतो केवळ भाषणातून नाहीतर कृती तून सामाजिक बदल कसा घडवता येतो याचे हे जिवंत उदाहरण सरपंच सौ उषा दिनकर मापारी यांच्या कार्यातून दिसून येते विशेषता त्यांचे पती श्री दिनकर मापारी यांचे त्यांना पाठबळ मिळते.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेबांची दुर्दैवी बातमी कळाली आणि मन सुन्न झालं–सौ.सुदामतीताई रत्नाकर गुट्टे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेबांची सकाळी दुर्दैवी बातमी प्रसिद्धी माध्यमात समोर आली. महाराष्ट्रसह मलाही विश्वास बसला नाही परंतु दुर्दैवाने ती बातमी खरी आहे असे समजताच अगदी मन्न सुन्न झाल्याची झाले असल्याची शोक भावना व्यक्त करताना सामाजिक कार्यकर्त्या सौ सुद्धामतीताई रत्नाकर गुट्टे यांनी जड अंतकरणाने. भावपूर्ण श्रध्दांजली व्यक्त केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब आज बारामतीमध्ये दाखल होणार होते.विमान लँडिंग वेळी हा अपघात झाला. या बातमीने मन पिळवटून गेले अजित दादा बरोबर अनेकदा माझे व माझ्या कुटुंबाचा संवाद होता. त्यातूनच गंगाखेड शुगर दादामुळेच होऊ शकला आणि माझ्या राजकीय जिवनाचा प्रवास सुरू झालेला आहे दादा म्हणजे शब्द एकदा शब्द दिला कि तो पुर्ण करणारा आदर्श नेता आपण गमवला आहे. यामुळे असा दुसरा दादा होणे नाही अश्या अकाली जाण्याने महाराष्ट्राची फार मोठी हानी झाली असुन कधी न भरुन येणारी ही दुर्दैवी घटना



आज घडली असून मी व माझ्या परिवाराच्या वतीने स्वर्गीय अजित दादा पवार साहेबांना ईश्वर शांती देईल व पवार कुटुंबीयांवर हे कोसळलेल्या दुःख झेलण्याची ताकद प्रभुवैद्यनाथ देईल अशी भावना सामाजिक कार्यकर्त्या सौ सुदामती रत्नाकर गुट्टे यांनी व्यक्त केल्या


## फुले,शाहू आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचे प्रभावशाली नेता हरवला

# महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांचे अकाली निधन वार्ता मनाला छेदणारी–भास्कर रोडे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**


–महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांचा विमान अपघातात झालेल्या अकाली व दुर्दैवी निधनाची वार्ताअत्यन्त धक्कदायक मनाला छेदणारी ही घटना स्विकारणे कठीण आहे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान देणारा. निर्णयक्षम आणि प्रचंड कामाची ताकद असलेला नेता आज आपल्यात नाही. ही महाराष्ट्रासाठी मोठी व अपूरणीय हानी आहे त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. ती सहज भरून निघणारी नाही त्यांच्या कार्याचे परंपरा आणि विकासाची दृष्टी दृष्टी प्रेरणादायी राहिल. असे मत आर. पी. आय. आठवले गटाचे राज्य सचिव. भास्कर नाना रोडे दुःख व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या राजकीय कारकिर्दीत मा.अजितदादा पवार यांनी आमदार, खासदार, विविध खात्यांचे मंत्री तसेच उपमुख्यमंत्री अशा अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या आणि प्रत्येक पदाला त्यांनी पूर्ण न्याय दिला. राजकारणासोबतच सामाजिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, कला व क्रीडा क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. बारामतीसह पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात मोठया प्रमाणात विकासकामे करून त्यांनी या शहराचा चेहरामोहरा बदलून दाखवला. सर्वसामान्य लोकांची कामे झाली पाहिजेत, हीच त्यांची कायम भूमिका होती. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.मा.अजित दादा पवार यांची प्रशासनावर मजबूत पकड होती. राज्याचे नेतृत्व करत असताना त्यांनी संस्थात्मक बांधणी केली, नेतृत्वाची पुढील पिढी घडवली आणि सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर विशेष भर दिला. विरोधी पक्षातील नेत्यांशीही त्यांचे मैत्रीपूर्व संबंध सांभाळत होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी राजकीय हानी झाली आहे. स्व.विलासराव देशमुख, स्व.गोपीनाथ मुंडे साहेब यांच्याप्रमाणेच मा.अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने झोपेत स्वप्न पहिल्यागत झाले.. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. तसेच पवार कुटुंबीयांना व राज्यातील सर्व समर्थकाना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो अशी शोकभावना आर. पी. आय. आठवले गटाचे.राज्य सचिव. भास्कर रोडे यांनी व्यक्त केली...




# मुंबईत इंडिया आर्ट फेस्टिव्हल : समकालीन भारतीय कलेचा भव्य कला उत्सव;३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

समकालीन भारतीय कलाउत्सव 'इंडिया आर्ट फेस्टिव्हल' ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नेहरू सेंटर, वरळी येथे मुंबईत पुन्हा एकदा दिमाखात भरत आहे. देश-परदेशातील कलावंतांना एकत्र जोडणाऱ्या या महोत्सवात भारतील कलावंतांनी साकारलेल्या वैविध्यपूर्ण कलाकृतींचे दर्शन घडणार आहे.भारतीय कला महोत्सवाची मुंबईतील ही १४ वी, तर देशपातळीवरील ३७ वी आवृत्ती आहे. सर्वसमावेशक अशी विचारप्रणाली म्हणजे स्वतंत्र चित्रकार व कलादालने यांचा एकत्र असा मंच निर्माण करणे हा कला महोत्सवाचा मूळ उद्देश राहिला आहे. त्यामुळे कलाक्षेत्रात गेल्या पंधरा वर्षात इंडिया आर्ट फेस्टिव्हल लोकप्रिय झाला असून व मुंबईतच नव्हे तर दिल्ली, बंगलोर, हैदराबाद आदि शहरांमध्ये देखील कलाक्षेत्रात महोत्सवाचे स्थान अधिक दृढ झाले आहे.३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजल्यापासून कला संग्राहक व विशेष आमंत्रितांसाठी प्रदर्शनाचे आयोजित करण्यात आले असून, प्रदर्शन ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी असे दोन दिवस सर्वसामान्य रसिकांसाठी खुले राहील.या वर्षीच्या कला महोत्सवात ४५ कला दालनं, स्टुडिओज व आर्टिस्ट कलेक्टिवज सहभागी होत असून ५५० कलाकारांच्या ४,५०० हून अधिक कलाकृती तब्बल १५० दालनांमधून सादर केल्या जाणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात चित्रकार-





शिल्पकार व त्यांच्या कलाकृती एकाच मंचावर पाहण्याची पर्वणी कलाकार, संग्राहक आणि कला रसिकांसाठी आर्ट फेस्टिव्हल दरवर्षी मुंबई, दिल्ली, बंगलोर व हैदराबाद या शहरांमध्ये घेवून येत असतो व कलावंत देखील महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात..२००८ साली स्थापन केलेल्या इंडिया आर्ट फेस्टिव्हलची संकल्पना ग्रामीण आणि निमशहरी भागांतील कलाकारांना एकत्र व मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मांडण्यात आली होती. कालांतराने हा उपक्रम एका सशक्त राष्ट्रीय कला चळवळीत रूपांतरित झाला असून, मुंबई, दिल्ली, बेंगळुरू आणि हैदराबाद यांसारख्या प्रमुख सांस्कृतिक केंद्रांमध्ये उदयोन्मुख कलाकारांना कलासंग्राहक व रसिकांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य तो करीत आहे.याविषयी बोलताना इंडिया आर्ट फेस्टिव्हलचे संस्थापक राजेंद्र पाटील म्हणतात,इंडिया आर्ट फेस्टिव्हलची संकल्पना ही एक सर्वसमावेशक व्यासपीठ म्हणून करण्यात आली होती. कलाकारांना थेट दर्शकांशी संवाद साधता येईल व आपल्या कलाकृतींना चित्रखरेदीदार वर्गापर्यन्त पोहचविता असा त्यामागे दुहेरी हेतु होता.'मुंबई २०२६ आवृत्तीत सहभागी दालनांमध्ये मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, हैदराबाद, उदयपूर, शांतिनिकेतन, गोवा, नागपूर व पुणे यांसह देशभरातील कलादालनं, तसेच सिंगापूर, दुबई आणि झ्युरिख (स्वित्झर्लंड) येथील कला दालनांचा आंतरराष्ट्रीय सहभागी पाहायला मिळतो. आर्टिस्ट्स पॅव्हिलियनमध्ये स्वतंत्र कलाकारांची लक्षणीय उपस्थिती दिसून येत असून त्यात ओम थाडकर, अंजली प्रभाकर, राजीव राय, कविता सचदेव, प्रविणा पारेपल्ली, धनश्री वझलवार, अशोक राठोड, कांचन महंते, शुभांगी जांगडे, एम. नारायण, शोभिता हरिहरन, अनिल वर्गीस, अरुल मुरुगन, रिया दास, सीमा गुप्ता, महेश सौंदत्ते, रुता इनामदार, युवराज पाटील, दीपा नाथ, पियाली सरकार, देव मेहता, राहत काझमी, विनीत कुमार, ॲना कुरियन, रुपाली मन्सिंगका, लक्ष्मी सुकुमारन, अंजुम शाह, चांदनी गुलाटी अग्रवाल, उमा कृष्णमूर्ती आदींसह शेकडो कलाकार सहभागी आहेत.गॅलरी सादरीकरणांमध्ये आधुनिक कलेतील दिग्गज आणि समकालीन कलाकारांची प्रभावी सांगड पाहायला मिळेल. यामध्ये एम. एफ. हुसेन, कृष्णेन खन्ना, जोगेन चौधरी, अकबर पदमसी, अंजोली एला मेनन, परेश मैती, मनु पारेख, अतुल दोडिया, टी. वैकुंठम, लालू प्रसाद शॉ, माधवी पारेख, लक्ष्मा गौड, जतिन दास आदींच्या कलाकृतींचा समावेश आहे. यामुळे संग्राहकांना एकाच ठिकाणी नामवंत तसेच उदयोन्मुख कलावंतांच्या कलाकृती एकाच व्यासपीठावर पाहण्याची दुर्मिळ संधी मिळणार आहे.२०२६ मध्ये मुंबईत पुनरागमन करताना, इंडिया आर्ट फेस्टिव्हल भारताच्या विकसित होत असलेल्या कलापरिसंस्थेत एक प्रेरक घटक म्हणून आपली भूमिका पुन्हा अधोरेखित करून, सर्वसमावेशकता आणि सर्जनशील देवाणघेवाणीची परंपरा पुढे नेत आहे.२००८ मध्ये स्थापन झालेला इंडिया आर्ट फेस्टिव्हल आज भारतातील अग्रगण्य समकालीन कला मेळाव्यांपैकी एक मानला जातो. कलाकार, कला दालनं आणि कला संस्थांना एका सर्वसामावेश चौकटीत एकत्र आणत, इंडिया आर्ट फेस्टिवलं ने भारतातील कला प्रदर्शनांची संकल्पनाच नव्याने परिभाषित केली आहे. सर्व स्तरांतील कलाकारांच्या प्रतिभेचा उत्सव साजरा करणारी ही कला चळवळ म्हणजे एक सुलभ आणि सर्वसमावेशक, सार्वजनिक म्हणता येईल अशी कला परिसंस्था आज बनली आहे.

# महामानव प्रतिष्ठानचा प्रजासत्ताक दिन साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महामानव प्रतिष्ठान व मिलन नगर रहिवाशी सोसायटीच्या वतीने कुर्ला पूर्व येथे भारताचा प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला .कुर्ला पूर्व शिवसृष्टी रोड येथील मिलन नगर येथे भारताचा प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहपूर्व वातावरणात साजरा करण्यात आला.महामानव प्रतिष्ठान व एक वही एक पेन अभियानचे अध्यक्ष राजू झनके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरीक व बीड येथील शेतक-यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.आपला भारत देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो व शेतकरी हा देशाचा आत्मा असल्याने शेतक-यांना ध्वजारोहणाचा मान दिल्याचे यावेळी झनके यांनी सांगितले .डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताला संविधान अर्पण केल्यानंतर भारताची ओळख लोकशाही प्रधान देश म्हणून झाली असे ते म्हणाले.मिलन नगर रहीवाशी



सोसायटीचे खजिनदार संजय लोंढे,रिंकूताई लोखंडे,राजेश पाथरे,वाघूजी साबळे आदींची यावेळी समयोचित भाषणे झाली .सदर प्रसंगी देशभक्तीपर गीत सादर करणा-या विद्यार्थ्यांना शारेय साहीत्यांचे वितरण करण्यात आले .स्थानिक नागरीक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री एकविरा विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

चारकोप, कांदिवली येथील श्री एकविरा विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भारतीय नौदलाच्या आयएनएस मालाड येथील लेफ्टनंट कमांडर ईशा सिंग यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण पार पडले.या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री अजित पाटील, कार्यवाह श्री विनायक पाटील तसेच विश्वस्त मंडळाचे सदस्य उपस्थित होते. पूर्व-प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री मदन शिरकांडे यांनी केले. अध्यक्ष श्री अजित पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत भारतीय संविधानाचे महत्त्व, शिस्त, देशप्रेम आणि जबाबदार नागरिक म्हणून असलेल्या कर्तव्यांबाबत मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुण्या लेफ्टनंट कमांडर ईशा सिंग यांनी प्रेरणादायी भाषण करत विद्यार्थ्यांना संरक्षण दलात सामील होण्याचे, देशसेवेला प्राधान्य देण्याचे तसेच जबाबदार आणि सजग नागरिक बनण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात राष्ट्रगीत, देशभक्तीपर गीते, सांस्कृतिक सादरीकरणे आणि विद्यार्थ्यांचे विविध कलात्मक कार्यक्रम सादर करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागामुळे संपूर्ण परिसर देशप्रेमाच्या भावनेने भारावून गेला. या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, कर्तव्यभावना आणि देशसेवेची प्रेरणा अधिक दृढ झाल्याचे स्पष्ट झाले. श्री एकविरा विद्यालयाने अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची ज्योत सदैव प्रज्वलित ठेवली आहे.

# दिव्यात धर्मवीर आनंद दिघे जयंती निमित्त भव्य आरोग्य शिबीर संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

धर्मवीर आनंद दिघे हृदयरोग व मुत्रविकर उपचार केंद्र छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल कळवा व शिवसेना शाखा गणेश पाडा यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंती निमित्त खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे व विभागप्रमुख चरणदास म्हात्रे यांच्या आयोजनाने मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.



प्रसंगी शिबिराच्या माध्यमातून हॉस्पिटल मध्ये होणाऱ्या सर्जरी ॲंजिओप्लास्टी शस्त्रक्रिया, यु.आर.एस.एल.सर्जरी, हार्ट फेलर उपचार, बायपास शस्त्रक्रिया, वाल्व शस्त्रक्रिया, गायनंक शस्त्रक्रिया, पेसमेकर शस्त्रक्रिया, अपेन्डिस शस्त्रक्रिया, पी.सी.एन.एल.सर्जरी, स्तनाची शस्त्रक्रिया, थ्रोम्बोलायझेशन उपचार, हार्निया शस्त्रक्रिया, मुतखडा शस्त्रक्रिया, टी.यु.आर.पी.सर्जटी, ई.सी.जी, ब्लड प्रेशर, वजन तपासणी, रॅण्डम ब्लडशुगर, तज्ञ डॉक्टरांचा सल्ला, उपचार व शस्त्रक्रिया करण्यात आल्या. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत, पिवळे, पांढरे व केशरी रेशनकार्ड धारकांना मोफत तपासणी, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना अंतर्गत गंभीर आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सदर शिबीर शिवसेना शाखा गणेशपाडा, दातीवली, दिवा ठाणे येथे पार पडले. प्रसंगी सदर शिबिरात दिवेकरांनी मोठ्या संख्येने भाग घेतला तर शाखाप्रमुख संतोष देसाई, शंकर पाटील व बिभीषण म्हात्रे तसेच जयदास शेलार, महेश पाटील, मुकुंद पाटील, चंदन पाटील, राजेश पाटील आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गव्हाण-कोपरच्या आरोग्य केंद्रात महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते ध्वजवंदन

दैनिक वादळ वार्ता
**उलवे । प्रतिनिधी**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते गव्हाण-कोपरच्या आरोग्य केंद्रात ध्वजवंदन करण्यात आले. सकाळी ते शेलघर, रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, खारकोपर येथील जिल्हा परिषद शाळा, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल आदी ठिकाणीही ध्वजवंदनासाठी आवर्जून उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. यावेळी ध्वजवंदनासाठी पोलिस अधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. त्या त्या शाळांच्या



मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी ध्वजवंदन उत्तम तयारी केलेली होती.यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर, अरुणशेठ भगत आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्याने उपस्थित होते.

# श्रमजीवी महिला माळी मंडळाचा हळदीकुंकू समारंभ

दैनिक वादळ वार्ता
**नवी मुंबई । प्रतिनिधी**

श्रमजीवी महिला माळी मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हळदीकुंकू समारंभ उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला. या समारंभास परिसरातील नागरिकांसह राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमास भेट दिली व शुभेच्छा व्यक्त दिल्या.



महिला पतंजली ग्रुप ऐरोली, विश्व मांगल्य महिला ग्रुप, नवनिर्वाचित नगरसेविका पूजाताई पाटील, हेमांगी ताई सोनवणे, ऐश्वर्या सोनवणे, श्रेया जिरगे,रेश्मा मढवी,माजी नगरसेविका विनायताई मढवी या प्रसंगी उपस्थित होते. महिलांना हळदीकुंकू लावून वाणाचे वाटप करण्यात आले. तसेच महिलांसाठी १० लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले असून, विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. अशी माहिती श्रमजीवी महिला मंडळाच्या सचिव शितल शिंदे यांनी दिली.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, भविष्यात संत सावता माळी मंडळाच्या माध्यमातून आरोग्यविषयक तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रमजीवी महिला मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी मोलाचे सहकार्य केले.यामध्ये अध्यक्षा इंदुमती भास्कर,खजिनदार धनश्री शिंदे तसेच उज्वला शिंदे, मंगल नाईक, मानसी नाईक, तसेच सर्व कार्यकारिणी व सभासदांचा समावेश होता.या हळदीकुंकू कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल संत सावता माळी मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत थोरात तसेच सचिव रोहित हरिश्चंद्र भुजबळ यांनी श्रमजीवी महिला मंडळाच्या प्रत्येक सामाजिक कार्यामागे संत सावता माळी मंडळ ठामपणे उभे राहील. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे ,स्वतःचे अस्तित्व तयार करावे , पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ,प्रगती करावी असा एक कानमंत्र दिला.

# वसंत पंचमी उत्सव मंडळ (रजि.)ट्रस्ट उरण तर्फे सरस्वती महापूजा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

हिंदू धर्मात माता सरस्वतीला विद्येची,ज्ञानाची देवता म्हणून पूजले जाते.ज्ञानाची विद्येची उपासना करणारे भक्त माता सरस्वतीची मोठ्या भक्ती भावाने पूजा अर्जा करीत असतात.माता सरस्वतीची पूजा अर्चा भक्ती केल्याने विद्येची,ज्ञानाची प्राप्ती होते अशी भाविक भक्तांची श्रद्धा आहे. उरण मध्येही माता सरस्वतीची मोठ्या प्रमाणात पूजा अर्चा भक्ती केली जाते वसंत पंचमी उत्सव मंडळ (रजि.)ट्रस्ट उरण तर्फे दरवर्षी सरस्वती महापूजेचे आयोजन उरण मध्ये करण्यात येते.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विठ्ठल मंदिर, देऊळवाडी उरण शहर येथे सरस्वती महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी ९ वाजता माँ सरस्वती देवी पूजा,दुपारी २ ते ४:३० या वेळेत कीर्तन व भजन, सायंकाळी ५ ते ७: ३० या वेळेत सुंदरकांड पाठ, सायंकाळी ७:३० वाजता महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन



यावेळी करण्यात आले होते. भाविक भक्तानी माता सरस्वतीचे दर्शन घेऊन विविध धार्मिक कार्यक्रमाचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. एकंदरीत सर्वच कार्यक्रम मोठ्या उत्साहात व उत्तम प्रतिसादात संपन्न झाले. सदर उपक्रमाचे विविध धार्मिक कार्यक्रमाचे उत्तम व सुंदर असे आयोजन नियोजन करण्यात आल्याने सर्वांनीच या कार्यक्रमाचे कौतुक केले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वसंत पंचमी उत्सव मंडळ (रजि.)ट्रस्ट उरणचे अध्यक्ष दिनेश जयस्वाल,उपाध्यक्ष रंजनकुमार, महासचिव पि.टी. चव्हाण, सचिव दीपक मिश्रा, कोषाध्यक्ष मनोज शर्मा, सहसचिव अनिल कुमार, सहसचिव राम चव्हाण,संघटन मंत्री कामेश्वर शर्मा, संघटन मंत्री शास्त्री पंडित पांडे,संघटन मंत्री करण पाटील, सहसचिव रुपेश पाटील,सहसचिव राकेश रंजन यांच्यासह संरक्षक आशा पारेख, अमर श्रीवास्तव, पी एन सिंह, श्रीकृष्ण शर्मा, राजेश विश्वकर्मा यांच्यासह सर्व संरक्षक, वसंत पंचमी उत्सव मंडळ (रजि.)ट्रस्ट उरणचे सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077